



दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : २६८
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, शनिवार, दि.१० मे २०२५


# भारत आरपारच्या तयारीत ; हाफिज सईद, मसूद अजहरनंतर कोणाचा नंबर?

**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि .०९, नवी दिल्ली :** भारतानं 'ऑपरेशन सिंदूर' अंतर्गत पाकिस्तानमधील दहशतवादी संघटनांवर मोठी कारवाई केली. यात लष्कर-ए-तैयबा, जैश-ए-मोहम्मद आणि हिज्बुल मुजाहिदीन यांसारख्या संघटनांचे तळ उद्ध्वस्त केले. या कारवाईमुळे हाफिज सईद, मसूद अजहर आणि सलाहुद्दीन यांसारख्या दहशतवाद्यांचे मोठं नुकसान झालं. यानंतर पाकिस्तानने भारतावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला, पण भारताने तो हाणून पाडला. आता भारताच्या निशाण्यावर पाकिस्तानमधील रावळपिंडी येथील जनरल हेडक्वार्टर (GHQ) आणि ISI चं केंद्र आहे.



पहलगाममध्ये २२ एप्रिल रोजी झालेल्या हल्ल्यात २६ लोक मारले गेले. यात पर्यटक आणि स्थानिक नागरिकांचा समावेश होता. या हल्ल्यामुळे भारतावर कारवाई करण्याचा दबाव होता. यानंतर भारताने 'ऑपरेशन सिंदूर' सुरू केलं. 'ऑपरेशन सिंदूर' भारतानं दहशतवादाविरुद्ध उचललेलं एक मोठं पाऊल आहे. या कारवाईमुळे पाकिस्तानमध्ये खळबळ उडाली आहे. कोणत्याही परिस्थितीत दहशतवाद खपवून घेणार नाही, असा स्पष्ट संदेश भारतानं ऑपरेशन सिंदूरमधून दिला.

भारताने केलेल्या कारवाईनंतर पाकिस्तानने ७ मे रोजी भारतावर क्षेपणास्त्र आणि ड्रोननं हल्ला करण्याचा प्रयत्न केला. पाकिस्ताननं जम्मू, पठाणकोट, श्रीनगर, अमृतसर, लुधियाना, भुज आणि फलोदी या शहरांना लक्ष्य केलं. पण भारताच्या S-४०० हवाई सुरक्षा यंत्रणेनं पाकिस्तानचे मनसुबे हवेतच नष्ट केले. यामुळे पाकिस्तानचा डाव फसला. भारताची युद्ध सज्जता आणि लष्करी क्षमता यामुळे जगासमोर आली. भारताच्या ड्रोन्सनी पाकिस्तानच्या अनेक शहरांमध्ये कारवाया करत एकच खळबळ उडवून दिली. भारताच्या ड्रोन्सनी पाकिस्तानची हवाई सुरक्षा यंत्रणा उद्ध्वस्त केली.

भारताकडून सुरु असलेला सैनिकी कारवाईचा धडाका पाहता आता पुढचं लक्ष्य रावळपिंडीतील जनरल हेडक्वार्टर असणार का? असा प्रश्न निर्माण झाला आहे. याबाबत सरकारनं अजून कोणतीही घोषणा केलेली नाही. पण संरक्षण सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, जर पाकिस्ताननं पुन्हा आगळीक केली, तर भारताची पुढील कारवाई पाक सैन्याच्या कमांड हेडक्वार्टर किंवा ISI च्या सेंटरवर होऊ शकते. विश्लेषकांच्या कयासानुसार, जोपर्यंत पाकिस्तानचं सैन्य आणि ISI दहशतवाद्यांना मदत करत राहील, तोपर्यंत भारताचा दृष्टिकोन आक्रमक राहील. 'ऑपरेशन सिंदूर'नं दहशतवाद्यांची कंबर मोडली आहे.

भारतीय हवाई दलानं ७ मे रोजी रात्री १.०५ ते १.३० च्या दरम्यान पाकिस्तान आणि झेघमधील नऊ दहशतवादी तळांवर एअर स्ट्राईक केला. हे तळ बहावलपूर, मुजफ्फराबाद, कोटली आणि इतर महत्त्वाच्या ठिकाणी होते. ठअथ आणि मिलिटरी इंटेलिजेंसने दिलेल्या माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली. यात ९० पेक्षा जास्त दहशतवादी मारले गेले. 'ऑपरेशन सिंदूर' अंतर्गत भारताने हाफिज सईद, मसूद अजहर आणि सैयद सलाहुद्दीन या तीन मोठ्या दहशतवाद्यांना लक्ष्य केले. त्यांचे प्रशिक्षण केंद्र, शस्त्रसाठा आणि ऑपरेशनल हेडक्वार्टर नष्ट केले. या ठिकाणी रॉकेट लॉन्चर, अघ-४७ रायफल्स, ड्रोन आणि पाकिस्तानी सैन्याने दिलेले साहित्य होते.

'ऑपरेशन सिंदूर' आणि त्यानंतरच्या कारवाईने दहशतवाद्यांना आणि पाकिस्तानच्या सैन्याला एक स्पष्ट संदेश दिला आहे. आता GHQ किंवा ISI देखील सुरक्षित नाहीत. प्रत्येक चुकीच्या गोष्टीला चोख प्रत्युत्तर दिले जाईल, असा संदेश भारतीय सैन्यानं दिलेला आहे. या कारवाईनंतर पाकिस्तानातील दहशतवादी संघटनांमध्ये भीतीचे वातावरण आहे. भारतानं दहशतवाद्यांचं कंबरडं मोडलं आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावरही भारताच्या भूमिकेचं समर्थन केले जात आहे. त्यामुळे पाकिस्तानवर मोठा दबाव आहे. आता पाकिस्तान काय भूमिका घेतो, हे पाहणं महत्त्वाचं ठरेल. पण भारतानं दहशतवादाविरोधात निर्णायक लढाई सुरू केली आहे. ऑपरेशन सिंदूरमुळे भारताची प्रतिमा आंतरराष्ट्रीय स्तरावर अधिक मजबूत झाली आहे. अनेक देश भारताच्या पाठिशी उभे आहेत. त्यामुळे पाकिस्तान एकटा पडला आहे.

## थोडक्यात

### दोन्ही राष्ट्रवादी एकत्र आल्यास आनंदच : विखे पाटील

**अक्षराज : वसंत रांधवण**
**दि.०९, अहिल्यानगर :** दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणाच्या चर्चा राज्यात खूप रंगल्या असताना, गुरुवारी राज्याचे जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येत असेल आनंदच असल्याचे सांगितले. दरम्यान त्यांची (शरद पवार) विचारधारा नेमकी काय आहे हे त्यांनाच विचारावं लागेल कारण त्यांची भूमिका कोणत्या विचारधारेवर आधारित आहे हेच मला माहित नाही असेही ते म्हणाले.



सिंचन भवन येथे आयोजित आढावा बैठकीनंतर ना. विखे पाटील पत्रकारांशी बोलत होते. ते म्हणाले, राष्ट्रवादी काँग्रेसमधून अजित पवार यांचा एक गट ठरवून बाहेर पडला आहे. आणि आता जर ते एकत्र येत असतील तर आम्ही आक्षेप घ्यावा असे काही नाही. हा त्यांच्या पक्षाचा निर्णय आहे तो त्यांनी घ्यावा. दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसचे विलनीकरण करावं, किंवा स्वतंत्र राहावे की अगदी दोन राष्ट्रवादी विलीनीकरण करून तिसरा पक्ष काढावा हा सर्वस्वी निर्णय त्यांचा आहे. दरम्यान त्यांची विचारधारा नेमकी काय आहे हे त्यांनाच विचाराव लागेल कारण त्यांची भूमिका कोणत्या विचारधारेवर आधारित आहे हेच मला माहित नाही असेही ते म्हणाले.

सिंचन भवन येथील बैठकीत शरद पवार गटाचे आमदार उत्तम जानकर हे देखील उपस्थित होते, त्यांना शरद पवार यांच्या विधनाबाबत विचारले असता त्यांनी सोलापूरचे आम्ही चार आमदार दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र यावी यासाठी जयंत पाटील यांना भेटलो होतो. तसेच पवार साहेबांना पण याविषयी बोलणे झाले होते, असे ते म्हणाले.

### देशविरोधी कारवायांप्रकरणी नागपुरात तरुणाला अटक

**दि.०९, नागपूर :** भारताविरोधी आक्षेपार्ह लेखन करणाऱ्या एका विद्यार्थ्याला अटक करण्यात आली. केरळमधील पत्रकार आणि विद्यार्थी कार्यकर्ता रेजाज एम. शिबा सिदीक (वय २६, रा. एडपल्ली, एर्नाकुलम, केरळ) याला देशविरोधी कारवायांप्रकरणी नागपूर पोलिसांनी अटक केली आहे. त्याच्याविरोधात भारतीय दंड संहितेच्या विविध गंभीर कलमांतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे.



रेजाज सिदीक 'डेमोक्रॅटिक स्टुडंट्स असोसिएशन' या संघटनेशी संबंधित असून, तो मक्तूब मीडिया आणि दि ऑब्झर्व्हर पोस्ट यांसारख्या माध्यमांतून जातीय भेदभाव, धार्मिक हिंसाचार, राज्य दडपशाही आणि वंचित समुदायांच्या प्रश्नांवर लेखन करतो. तो नुकताच दिल्लीला गेला होता. परतीच्या प्रवासात तो नागपूर येथे त्याच्या मैत्रिणीला भेटण्यासाठी थांबला असताना, पोलिसांनी गुप्त माहितीच्या आधारे त्याला अटक केली. पोलिसांच्या माहितीनुसार, सिदीकने आपल्या इंस्टाग्राम अकाउंटवर भारतीय सैन्याच्या पाकिस्तानमधील Operation Sindoor व छत्तीसगडमधील ऑपरेशन कगार या नक्षलविरोधी मोहिमांवर टीका करणाऱ्या आणि भारत सरकारविरोधात द्वेष निर्माण करणाऱ्या पोस्ट शेअर केल्या होत्या. ऑपरेशन सिंदूर मानवतेविरोधातील हल्ला आहे असे आक्षेपार्ह विधानही त्याच्या मोबाईलमधून सापडले असल्याचीही माहिती आहे.

# मुख्यमंत्र्यांनी घेतला राज्यातील सुरक्षा, सज्जतेचा आढावा

**अक्षराज : जे. के. पोळ**
**दि.०९, ठाणे :** भारत आणि पाकिस्तानातील तणावाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पोलिस आणि प्रशासकीय यंत्रणेकडून राज्यातील एकूणच सुरक्षा आणि सज्जतेचा आढावा घेतला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी उपस्थित होते. मॉकड्रिल, ब्लॅकआऊट इत्यादी सर्वच बाबतीत समग्र आढावा घेताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी विविध दिशानिर्देश दिले. प्रभारी मुख्य सचिव राजेशकुमार, राज्याच्या पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला, मुंबई पोलिस आयुक्त देवेन भारती, मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी, नागरी सुरक्षाचे अतिरिक्त पोलिस महासंचालक प्रभातकुमार, गृहविभागाच्या प्रधान सचिव राधिका रस्तोगी, गुप्तवार्ता विभागाचे अतिरिक्त पोलिस महानिरीक्षक शिरीष जैन, मुंबई आणि मुंबई उपनगर जिल्हाधिकारी उपस्थित होते.



**यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेले निर्देश पुढीलप्रमाणे...**

- प्रत्येक जिल्ह्यात मॉकड्रिल करा आणि जिल्हा स्तरावर वॉर रूम स्थापित करा.
- राज्यातील महत्वाच्या पदांवर विशेषतः आरोग्य, आपत्ती व्यवस्थापन इत्यादी विभागांतील सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सुट्ट्या रद्द
- ब्लॅकआऊटवेळी हॉस्पिटलसोबत समन्वय यंत्रणा उभी करा. टार्गेट होऊ नये म्हणून लाईट बंद केले जातात, त्यामुळे पर्यायी विद्युत व्यवस्थेद्वारे यंत्रणा सुरू ठेवून, गडद रंगाचे पडदे अथवा गडद रंगाच्या काचा वापरून त्याचवेळी बाहेरून लाईट दिसणार नाही, अशी व्यवस्था करा.
- ब्लॅकआऊट म्हणजे काय आणि अशावेळी काय करावे, यांचे व्हिडिओ विद्यार्थी, नागरिक यांच्यापर्यंत पोहोचवा. व्यापक जनजागृती करा.
- केंद्र सरकारच्या 'युनियन वॉर बुक' चे सखोल अध्ययन करीत सर्वांना त्याची माहिती द्या.
- प्रत्येक जिल्ह्यात पोलिसांच्या सायबर सेलने समाजमाध्यमांवर देखरेख ठेवत पाकिस्तानला मदत करणारे हॅण्डल ओळखून त्यावर कारवाई करा. शत्रूला मदत करणारी अथवा चुकीची माहिती कुणी प्रसारित करीत असेल तर त्यावर कारवाई करा.
- प्रत्येक जिल्हाधिकारी यांना आपत्कालीन फंड आजच देणार, ज्यातून काही तातडीच्या साहित्याची खरेदी करायची असतील तर ती तत्काळ करता येईल. याव्यतिरिक्त कोणताही महत्वाचा प्रस्ताव यासंदर्भात आला तर तो १ तासात मंजूर करा.
- एमएमआर क्षेत्रातील सर्व महापालिकांची बैठक घ्या, त्यांनाही 'ब्लॅकआऊट' बाबत जागरूकता निर्माण करण्यास सांगा. यामध्ये सहकारी गृहनिर्माण संस्थांना सहभागी करून घ्या.
- पोलिस विभागाने नेहमीपेक्षा जास्त जागरूकता ठेवावी. देशद्रोही व्यक्तींच्या कारवाया वाढण्याची शक्यता पाहता अधिक कोंबिग ऑपरेशन करा आणि गस्त अधिक चोख करा.
- सैन्याच्या तयारी संबधित चित्रिकरण करणे आणि ते समाजमाध्यमांवर प्रसारित करणे हा गुन्हा आहे, त्यावर तत्काळ गुन्हे दाखल करा.
- सागरी सुरक्षा वाढविण्यासाठी आवश्यकतेनुसार फिशिंग ट्रॉलर्स भाड्याने घ्या
- नागरिकांना परिस्थितीबाबत अद्यावत व खरी माहिती पोहोचवणे यासाठी शासनाकडून व्यवस्था उभी करा.
- शासनाच्या अतिमहत्वाच्या पायाभूत सुविधा (उदा. विद्युतनिर्मिती, वितरण) यावर सायबर हल्ले होण्याची शक्यता लक्षात घेता सायबर विभागाकडून त्वरित सायबर ऑडिट करून घ्या
- सरकार आणि सुरक्षा यंत्रणा यात अधिक समन्वयासाठी मुंबईतील सैन्याचे तिन्ही दल तसेच कोस्टगार्डच्या प्रमुखांना पुढील बैठकीत व्हीसी माध्यमातून निमंत्रित करा.

# भारत-पाक तणावामुळे 'आयपीएल' लांबणीवर

**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि.०९, मुंबई :** भारत आणि पाकिस्तानमधील तणावपूर्ण वातावरणामुळे आयपीएल २०२५ अनिश्चित काळासाठी पुढे ढकलण्यात आले आहे. दोन्ही देशांमधील तणाव सतत वाढत आहे आणि लष्कराने जबाबदारी स्वीकारली आहे. आयपीएलचा अंतिम सामना २५ मे रोजी कोलकाता येथे होणार होता परंतु देशातील युद्धजन्य परिस्थितीमुळे तो रद्द करण्यात आला. यामागे, बीसीसीआयच्या एका अधिकाऱ्याने योग्य असं स्पष्टीकरणही दिले आहे.

बीसीसीआयच्या अधिकाऱ्याने पीटीआयला सांगितले - देशात युद्ध सुरू असताना आपण क्रिकेट खेळत राहणे चांगले वाटत नाही. याचा अर्थ असा की देशाची सुरक्षा खेळांपेक्षा जास्त महत्त्वाची आहे. लखनौ सुपर जायंट्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यातील सामना ९ मे रोजी एकाना स्टेडियमवर होणार होता. पण आता असे होणार नाही. ८ मे रोजी पंजाब किंग्ज आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यातील आयपीएल सामनाही सुरक्षेच्या कारणास्तव रद्द करण्यात आला. ८ मे रोजीच, भारतीय सैन्याने रात्री नियंत्रण रेषेवर आणि आंतरराष्ट्रीय सीमेवर मोठ्या काउंटर-ड्रोन ऑपरेशनमध्ये ५० हून अधिक पाकिस्तानी ड्रोन पाडले होते. पाकिस्तानने भारतात ड्रोन पाठवण्याचा प्रयत्न केला पण तो अयशस्वी झाला.



या घटनांनंतर आयपीएल रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. देशाची सुरक्षा प्रथम येते म्हणून हा निर्णय घेण्यात आला. खेळ नंतरही होऊ शकतो, पण देश सुरक्षित राहिला पाहिजे. देशातील सध्याच्या वातावरणात क्रिकेट खेळणे योग्य नाही. त्यामुळे आयपीएल २०२५ रद्द करण्यात आली आहे. परिस्थिती सामान्य झाल्यावरच ते पुन्हा सुरू केले जाईल.

यापूर्वी, आयपीएल प्रमुख अरुण धुमल यांनी काल रात्री एका निवेदनात म्हटले होते - आम्ही सरकारच्या सूचनांची वाट पाहत आहोत. लवकरच निर्णय घेतला जाईल. अरुण धुमल यांच्या गृहनगर धर्मशाला येथे पंजाब किंग्ज आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यातील सामना १०.१ षटकांनंतर रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. दरम्यान, भारतीय कर्णधार रोहित शर्मानेही भारतीय सैन्याला पाठिंबा दिला आहे. आता आयपीएलचे १६ सामने बाकी आहेत.

# संपादकीय

## उन्हाळी शिबिरांची उपयुक्तता किती?

वार्षिक परीक्षा संपून सुट्ट्या सुरू झाल्या की जिकडे तिकडे उन्हाळी शिबिरांची रेलचेल सुरू होते. प्रत्येक ठिकाणी गायन, वादन, नाट्य, अभिनय, नृत्य, साहसी खेळ जसे ट्रेकिंग, स्विमिंग अशा विविध विषयांशी निगडित शिबिरांचे आयोजन केले जाते. पालक ही आपल्या मुलांना परीक्षा संपल्या की उन्हाळी शिबिरात दाखल करतात. खरंतर उन्हाळी सुट्टीत मुलांनी मस्त मजा करावी, मित्र मैत्रिणींसोबत मनसोक्त खेळावे, बागडावे, मैदानी खेळ खेळावेत, आवडीची पुस्तके वाचावीत, मामाच्या गावाला किंवा खेडेगावात जाऊन निसर्ग अनुभवावा, गड किल्ल्यांची भटकंती करावी. मुलांनी त्यांची सुट्टी एन्जॉय करावी. पण असे करण्याऐवजी पालक आपल्या मुलांना उन्हाळी शिबीराच्या दावणीला बांधतात. मुलांचा कल, मुलांची आवड न पाहता पालक आपल्या मुलांना उन्हाळी दाखल करतात. वाढत्या स्पर्धेच्या युगात आपला मुलगा अभ्यासासोबतच इतर कलागुणांमध्येही मागे राहू नये म्हणून पालक आपल्या मुलांना उन्हाळी शिबिरात दाखल करतात पण ही उन्हाळी शिबिरं आपल्या मुलांसाठी किती उपयुक्त आहेत या उन्हाळी शिबिरांचा मुलांना खरंच उपयोग होतो का? याचा विचार मात्र पालक करीत नाहीत. उन्हाळी शिबिरातील मुलांच्या सुरक्षेबाबत आयोजक गंभीर आहेत का याचाही विचार पालकांनी करावा कारण तीन वर्षांपूर्वी म्हणजे कोरोनाच्या आधी पुण्यात एका शिबिरात मुळशी धरणात पोहायला गेलेल्या तीन मुलांचा बुडून मृत्यू झाला होता. या घटनेमुळे उन्हाळी शिबिरातील मुलांच्या सुरक्षेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. पालकांनीही आपल्या मुलांना उन्हाळी शिबिरात दाखल करण्यापूर्वी शिबिरातील सुरक्षा व्यवस्थेची खात्री केली पाहिजे. या शिबिरांना शासनाची मान्यता आहे का याचीही खात्री करायला हवी. सरकारनेही आयोजकांची क्षमता व सुरक्षा व्यवस्थेची पाहणी करूनच अशा शिबिरांना मान्यता द्यायला हवी. शिबिरादरम्यान जर काही दुर्घटना घडली तर त्या दुर्घटनेस आयोजकांनाच जबाबदार धरले पाहिजे. काही शिबिरांना मिळणारा प्रतिसाद उत्स्फूर्त असतो तर काहींना अल्प प्रतिसाद मिळतो अर्थात या शिबिरातून सर्वच गोष्टी शिकायला मिळतात असे नाही. याउलट वर्षभर चालणाऱ्या विविध शिबिरातून मुलांना अनेक गोष्टी शिकायला मिळतात असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. सुट्टीच्या दिवसातील शिबिरांना बऱ्यापैकी पैसे मोजावे लागतात. टीव्ही, मोबाईल, व्हिडीओ गेममध्ये डोके खुपसून बसण्यापेक्षा पैसे जात असले तरी मुले गुंतून राहत असल्यामुळे पालक हाही खर्च सहन करतात. पालकांचा हेतू उदात्त आहे मात्र पालकांनी मुलांच्या आवडीनिवडी जपाव्यात. आपल्याला हवे तसे नको तर मुलांना हवे ते देण्याचा, शिकवण्याचा प्रयत्न करावा. एकूणच या शिबिरांची आपल्या मुलांना कितपत गरज आहे याचा विचार करूनच पालकांनी आपल्या मुलांना उन्हाळी शिबिरात दाखल करावे.

## पळशीचा ग्रामसेवक लाच घेताना रंगेहात जाळ्यात

**अक्षराज : शरद भगत**

**दि.०९, बारामती :** बारामती तालुक्यातील पळशी येथील एका ग्रामसेवकाला लाच घेताना अटक केली आहे. अटक केलेल्या ग्रामसेवकाचे नाव कांतीलाल बापुराव काळाणे ,वय ५७ वर्ष आहे. या संबंधित अतुल भिलारे यांनी लाचलुचपत विभागाकडे तक्रार केली आहे .अतुल भिलारे हे बांधकाम ठेकेदार असुन भिलारे यांनी पळशी येथील मळई माता मंदिर येथे सिमेंट बंधार्याचे काम केले होते. या कामचे बिल मंजुर करण्यासाठी ग्रामसेवक काळाणे यांनी ३० हजार रुपयांची लाच मागितली. रक्कम ऐवढी मोठी असल्याने भिलारे यांनी तडजोड करायची विनंती केली ही तडजोड २५ हजारा वर झाली. तडजोड झाल्या नंतर भिलारे यांनी घडलेला प्रकार लाचलुचपत अधिकारी व वडगाव निंबाळकर पोलिस स्टेशनला कळवला. अधिकार्यांनी योग्य सापळा रचत ही रक्कम घेण्यासाठी पाण्याच्या टाकी जवळ आलेल्या ग्रामसेवकाला रंगेहात पकडून कारवाई केली. वडगाव निंबाळकर पोलिस स्टेशन मध्ये भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास पोलिस निरिक्षक अमोल भोसले लाचलुचपत प्रतिबंध विभाग पुणे हे करीत आहे.

# चाफेकर बंधू: आद्यक्रांतिकारी तिघे भाऊ

चाफेकर बंधू हे आद्यक्रांतिकारी होते. त्यांची नावे दामोदर हरिपंत चाफेकर यांचा जन्म दि.२४ जून १८६९, बाळकृष्ण हरिपंत चाफेकर यांचा जन्म १८७३ आणि वासुदेव हरिपंत चाफेकर यांचा जन्म १८८० अशी होती. १९व्या शतकाच्या उत्तरार्धात पुण्याचे ब्रिटीश प्लेग कमिशनर वॉल्टर चार्ल्स रँड यांची हत्या करण्यात या क्रांतिकारकांचा सहभाग होता. पुण्यातील जनता ही नियुक्त केलेल्या अधिकारी आणि सैनिकांच्या अत्याचारांनी त्रस्त होती. या हत्येत महादेव विनायक रानडे हेही साथीदार होते. वासुदेव हरिपंत चाफेकरांचा जन्म सन १८८०मध्ये चिंचवड मध्ये एका चित्पावन ब्राह्मण कुटुंबात झाला. त्यांनी मराठी भाषेमधून शिक्षण घेतले. कालांतराने ते पुण्यातील चिंचवड येथे स्थायिक झाले. वडील हरिपंत हे पुणे व मुंबई येथे हरिकथा सांगायचे. बालवयात तिघेही भाऊ कीर्तनात वडिलांना मदत करायचे. त्यांमुळे चाफेकर बंधूंच्या शिक्षणात खंड पडला होता. वासुदेव चाफेकर यांनी दामोदर चाफेकर आणि बाळकृष्ण चाफेकर या त्यांच्या बंधूंसह राजकारणात आणि क्रांतिकारी कारवायांमध्ये भाग घेतला. त्यांनी भारतीय तरुणांना शस्त्रांचे प्रशिक्षण दिले.

पुण्यातील राजकीय घडामोडींनी प्रेरित होऊन हे भाऊ क्रांतिकारक चळवळीकडे वळले. ब्रिटिशांनी आणलेल्या संमती वयाच्या विधेयकास त्यांचा तीव्र विरोध होता. भारतीय संस्कृतीत हस्तक्षेप करणाऱ्या ब्रिटिशांविरुद्ध टिळकांनी केसरीमधून घणाघाती प्रहार करायला सुरुवात केली होती. या आवाहनाने तीनही भाऊ प्रेरित झाले. त्यांनी लोकसंघटन केले. याचवेळी पुण्यात प्लेगच्या साथीने अक्राळविक्राळ स्वरूप धारण केल्याने ब्रिटिशांनी वॉल्टर चार्ल्स रँडला भारतात पाचारण केले. रँडने रोग निवारण करण्याच्या उपायांची सक्तीने अंमलबजावणी सुरू केली.हे करताना त्याने सामाजिक पायदंड पायदळी तुडवले. जसे की लोकांची घरे उपसून जाळणे, देवघरात जाऊन देवांचा अपमान करणे, तपासणीच्या नावाखाली महिलांशी अभद्र वर्तन करणे, कर्त्या पुरुषांना नामर्दाप्रमाणे हीन वागवणे. यामुळे चाफेकर बंधूच्या मनात ब्रिटिशाविरुद्ध तिरस्कार निर्माण झाला. या साऱ्यांचा सूड घेण्याची योजना त्यांनी तयार केली. वॉल्टर चार्ल्स रँडच्या पुण्यातील लोकांना दिलेल्या वाईट वागणुकीबद्दल या भावांनी त्याच्या वधाचा कट रचला. त्यावेळी व्हिक्टोरिया राणीच्या राज्यारोहणाचा हीरकमहोत्सव साजरा करण्यात येत होता. सगळीकडे रोषणाई करण्यात आली होती. तसेच मेजवानीचे आयोजन करण्यात आले होते. दामोदर चाफेकर या तरुणाने गाडी काढली व गणेश खिंड येथे वाट पाहत दि.२२ जून १८९७ रोजी मध्यरात्री निवासस्थानातून बाहेर पडलेल्या रँडवर जवळून गोळ्या झाडल्या. रँड हा काही काळ कोमात राहिला व कालांतराने दि.३ जुलै १८९७ रोजी मरण पावला. याचवेळेस दामोदराच्या भाऊ बाळकृष्णाने रँड सोबत बसलेल्या लेफ्टनंट आयर्स्टवर गोळ्या झाडल्या. सर्वसामान्यपणे चापेकर असा उल्लेख चुकीचा होत असला तरी या क्रांतिकारक बंधूंचे आडनाव चाफेकर असे होते. चापे या नावाचे गाव कोकणात नाही. या खुनाच्या घटनेनंतर चाफेकर बंधू हे आमचे नातेवाईक नाहीत, हे पटवण्यासाठी अनेक चाफेकरांनी आपले आडनाव चापेकर आहे,



असे सांगावयास सुरुवात केली.

त्यामुळे ब्रिटिश सरकार हादरून गेले. कित्येक दिवस ब्रिटिशांना मारेकऱ्यांचा शोध लागत नव्हता. शेवटी पंचमस्तंभि द्रविड बंधूनी- रामचंद्र व गणेश शंकर द्रविड यांनी या कटाची बातमी केवळ आर्थिक २०,०००रु. च्या लाभपोटी सरकारला दिली. नंतर वासुदेव चाफेकर व महादेव रानडे यांनी द्रविड बंधूंना ठार केले. तिघाही भावांना पकडण्यात आले. दामोदराला मुंबईत अटक झाली व दि.१८ एप्रिल १८९८ रोजी त्यास येरवडा तुरुंगात फासावर चढवण्यात आले. त्यापाठोपाठ वासुदेवाला दि.८ मे १८९९ व बाळकृष्णाला दि.१६ मे १८९९ रोजी फासावर चढवण्यात आले. अशा प्रकारे तीनही चाफेकर बंधू देशासाठी शहीद झाले. दामोदर चाफेकर यांनी आत्मचरित्र लिहिले होते, ते पोलिसांनी त्यांच्या ताब्यात ठेवले होते. पुढे हुतात्मा दामोदर हरी चाफेकर यांचे आत्मवृत्त या नावाने विठ्ठल गोपाळ खोबरेकर यांनी संपादित करून ते प्रकाशित केले. पुण्यानजीक असलेल्या चिंचवड गावाजवळच्या चौकाला चाफेकर चौक म्हणतात. या चौकात मध्यभागी एका टॉवरमध्ये दामोदर चापेकर यांचा सन १९७१मध्ये उभारलेला पुतळा होता. मात्र तो पुतळा रस्ता रुंदीकरणाच्या व उड्डाणपुलाच्या कामाच्या कारणाने सन २०१०मध्ये हलविण्यात आला. त्यानंतर चौकातच चापेकर बंधूंच्या समूह शिल्पाचे काम सुरू करण्यात आले होते. मात्र हे काम या ना त्या कारणावरून सतत रखडत होते. क्रांतिकारकांचे पुतळे तीन ते साडेतीन फुटांचे आणि त्यांखाली एक छोटा चौथरा अशा पद्धतीने काम चालू होते. परंतु क्रांतिवीर चाफेकर स्मारक समितीचे गिरीश प्रभुणे, बाळकृष्ण पुराणिक आदींनी या प्रकल्पातील त्रुटी निदर्शनास आणल्या. त्यानंतर तत्कालीन महापालिका आयुक्त डॉ.श्रीकर परदेशी यांनी चालू काम थांबवून नव्याने आराखडा करण्यास सांगितले. नव्या आराखड्यानुसार या चाफेकर चौकात दि.१० जुलै २०१६ रोजी दामोदर चाफेकर व बाळकृष्ण चाफेकर यांचे १२ फूट उंचीचे उभे आणि वसुदेव चाफेकर आणि महादेव रानडे यांचे बसलेले सात फूट उंचीचे पुतळे उभारण्यात आले आहेत.

**!! क्रांतिकारक चाफेकर बंधूंना त्यांच्या हौतात्म्य निमित्त मानाचा मुजरा !!**

– संकलन व सुलेखन –
कृष्णकुमार निकोडे गुरूजी
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सॲप- ९४२३७१४८८३.

# रणरणत्या उन्हात आ. देवराव भोंगळे यांच्या विकासकामांचा झंझावात !

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०९, गडचांदूर (चंद्रपूर) :** कोरपना तालुक्यातील गडचांदुर शहरात नागरी दलित वस्ती सुधार योजना तसेच सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान योजनेंतर्गत शहरातील मुलभूत सुविधांच्या विकासाकरता मंजूर ८ कोटी ७० लक्ष रुपयांच्या विविध विकासकामांचे ७ मे रोजी राजुरा विधानसभेचे आमदार देवराव भोंगळे यांच्या हस्ते गडचांदूरातील विविध वार्डात स्थानिक नागरिकांच्या साक्षीने व उपस्थितीत भूमिपूजन करण्यात आले.



या भूमिपूजन कार्यक्रमात गडचांदूर शहरातील राजीव गांधी चौक ते संताजी जगनाडे महाराज चौकापर्यंत पथदिवे खांब उभारणे, प्रभाग क्रं.२ मध्ये मुख्य रस्त्यापासून ते अकोले यांच्या घर ते पानघाटे ते ट्रान्सपोर्टपर्यंत सी.सी. रस्त्याचे बांधकाम करणे, प्रभाग क्रं.४ मध्ये माटे ग्लास ते भगवान नागरगोजे, यांच्या घरापर्यंत दोन्ही बाजूस सी.सी. नाली बांधकाम करणे, प्रभाग क्रं.३ मध्ये अली, यांच्या घरापासून ते झींगरे, यांच्या घरापर्यंत नाली बांधकाम करणे, प्रभाग क्रं.३ मध्ये अहिरकर, यांच्या घरापासून ते शाकीर अली यांच्या घरापर्यंत पेव्हर्स ब्लॉक लावणे, प्रभाग क्रं.५ मध्ये जैतू परचाके यांच्या घरापासून ते विजय गोहोकार यांच्या घरापर्यंत, पाईप नालीचे बांधकाम करणे, प्रभाग क्रं.२ मध्ये राज्य महामार्गापासून ते टेकाम सर यांच्या घरापर्यंत नाली बांधकाम करणे व प्रभाग क्रं.२ मध्ये मोहितकर ते किशोर बल्की यांच्या घरापर्यंत सी.सी.रस्ता व नाली बांधकाम करणे या कामांचा समावेश आहे.

या भूमिपूजनांचा शुभारंभ झाल्याने शहरातील मुलभूत सोयीसुविधांच्या विकासात निश्चितच भर पडेल, असा विश्वास याप्रसंगी बोलताना आ. भोंगळे यांनी व्यक्त केला.

मे महिन्याच्या रणरणत्या उन्हात दिवसभर आमदार देवराव भोंगळे यांनी शहरातील विविध वार्डात विकास कामांचे भूमिपूजन केले. भूमिपूजन स्थळी दादांच्या आगमनानंतर ठिकठिकाणी स्थानिक वार्डवासियांनी मोठ्या उत्साहात फटाक्यांची आतिषबाजी व पेढे वाटून एकमेकांचे तोंड गोड केले.

## रम्य कथा ..

युध्दाच्या कथा रम्य
विस्फारू ऐके कान
डोळे हो प्रत्यक्षदर्शी
हरपे खरोखर भान

शहारे फिरे अंगावर
एकवटते सारे ध्यान
दृश्ये जणू समोरघडे
टिपत राही मनयान

एकचं ध्येय प्रदर्शित
राखातिरंग्याचीशान
वेदना कल्लोळ उठे
संकटा करे परेशान

आयुष्य दोर सैलवी
पडे धारातीर्थी जान
लढत राहते मनतरी
जरी तनू पडे बेजान

धडाडता तोफबंदूक
गात राहे विजयगान
कुर्निसात करते रक्त
जंग विरांचा सन्मान

मृत्यूचेतांडव चालले
कितीराही सावधान
कनवाळू कधीमरण
कुणामिळे जीवदान

**– हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

# पाकची 'विनाशकाले विपरित बुद्धी'

२२ एप्रिल रोजी पाक पुरस्कृत दहशतवाद्यांनी बेसरन घाटीत बेछूट गोळीबार केला आणि त्यात जवळपास २६ भारतीय तसेच एका परदेशी नागरिकाचा मृत्यू झाला त, त्यामुळे देशातील जनतेमधे तीव्र प्रतिक्रिया उमटली किती काळ पाक पुरस्कृत दहशतवाद सहन करायचा? आणि किती काळ पाक ला गोंजारत बसायचे? केंद्र सरकारने देखील याची तातडीने गंभीर दखल घेतली आणि पंतप्रधानांनी दहशतवादी, त्यांचे आका, यांना यावेळी कल्पनेपलिकडील कारवाई केली जाईल असा कडक इशारा दिला आणि आपल्या सगळ्या यंत्रणा कामाला लागल्या. यापूर्वी देखील पुलवामा आणि ऊरी च्या घटनांचा चा बदला घरात घुसून बदला घेतांना आता चुकीला माफी नाही, भारत बदलला आहे याची जाणीव पाक आणि दहशतवाद्यांना करून दिली होती तरी देखील ' हम नही सुधरेंगे' ही पाकची मुळ प्रवृत्ती असल्याने त्याने पहलगाम हत्याकांड घडलेच आणि आपल्याच पायावर धोंडा मारून घेतला हे आता अधोरेखित होत आहे. यावेळी भारत आणि देशवासिय ऐकवटला आहे केंद्र सरकार, आपले सैन्य जे जे काही करेल त्याला एकमुखी पाठिंबा दिला आहे, आपल्या सैन्यदलाला पुर्ण मोकळीक देत कारवाईचे अधिकार दिले आणि केवळ पंधरा दिवसातच भारतीय सैन्याने काही दिवसांपूर्वी पाक मधील दहशतवादी स्थळांवर अचुक हल्ला करत पाक पुरस्कृत दहशतवाद्यांचे कंबरडेच मोडले आहे. आता निर्णायक कारवाई करणे हा एकच मार्ग भारतासमोर आहे आणि भारताने देखील आता एकदाच काय तो पाक आणि दहशतवाद्यांचा कायमचा बंदोबस्त करायचा निश्चय केला आहे म्हणूनच भारताचे ऑपरेशन सिंदुर अजुनही सुरू राहणार हे संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी स्पष्ट केले आहे.

भारतीय सैन्याला दहशतवाद्यांचे अड्डे, दहशतवाद्दी, त्यांना बळ देणारे पाक लष्कर, पाकचा लष्कर प्रमुख असीम मुनीर यांचाच बंदोबस्त करण्याचे लक्ष ठरवून दिले आहे आणि त्याप्रमाणेच कारवाया सुरु झाल्या आहेत. भारतीय लष्कराने सात मे रोजी भल्या पहाटे पाक पुरस्कृत दहशतवाद्यांच्या नऊ ठिकाणांवर हल्लाबोल केला या हल्ल्यात जवळपास दिडशे आतंकवादी त्यांचे आका मारले गेल्याचा अंदाज आहे. पाक हा नेहमीच दहशतवाद्यांना पोसणारा देश आहे हे अनेकदा अधोरेखित झाले आहे आणि आतंकवादाचा सर्वाधिक फटका भारताला बसला आहे त्याच बरोबर देशातील इतर देशांना देखील बसला आहे, अमेरिकास्थित ट्विन टॉवर ऊडवून देण्यात पाक पुरस्कृत दहशतवाद्दीच होते, ओसामा बिन लादेन ला पाकनेच आश्रय दिला होता. आंतरराष्ट्रीय स्तरावरून देखील पाक पुरस्कृत दहशतवाद थांबला जावा यासाठी प्रयत्न केले गेले, भारताने देखील अनेकदा आंजारून गोंजारून पाहिले, ऐवढेच नव्हे तर यूद्धाची खुमखुमी तीन चार वेळा जिरवली आहे मात्र पाक काही बदलायला तयार नाही. पहलगाम हत्याकांडाचे प्रत्युत्तर भारताने चोख दिले मात्र हे करतांना केवळ दहशतवादी ठिकाणांवर लक्ष केले, किमान आतातरी पाकने सुधारावे पण नाही त्यांचे नेते, लष्कर प्रमुख हे ताकद नसतांना युद्धाची भाषा बोलतात, पाक ने पुंछ सहित सीमावर्ती भागातील जैसलमेर, अमृतसर, भुज सारख्या अनेक शहरांवर क्षेपणास्त्रे डागली मात्र सैन्याने ती निकामी केली असली तरी अनेक भारतीय मृत्यू पावले आहेत आणि जखमी झाले आहेत,त्याला प्रत्युत्तर म्हणून भारतीय सैन्याने थेट लाहोर, इस्लामाबाद, सियालकोट या शहरांवर हल्ला केला, आता युद्ध सुरू झाले आहे मात्र यात अंतिम विजय होणार तो भारताचाच आणि कायमचा बंदोबस्त होणार तो पाकिस्तानचाच यात शंका नाही. भारताच्या भुमिकेला आंतरराष्ट्रीय जगतातुन पाठिंबा मिळत आहे अगदी इस्लामिक राष्ट्रे त्यांची इस्लामिक संघटना परिषद (आयओसी) या सारख्या संघटना देखील भारताच्या भुमिकेचे समर्थन करत आहेत. युद्ध हे कशाचेही ऊत्तर नाही, युद्धाने आजवर नुकसानच झाले आहे आणि युद्ध कोणालाही परवडणारे नाही याची जाणीव आंतरराष्ट्रीय जगताला आहे म्हणूनच आता भारत - पाक युद्ध थांबले गेले पाहिजे यासाठी ईतर देशांचे प्रयत्न सुरू झाले आहेत आणि भारताला देखील युद्ध नको आहे ही भारताची पहिल्या पासुन भुमिका राहिली आहे मात्र पाक ला कायमचा धडा शिकवला गेलाच पाहिजे या भुमिकेतुन भारत कारवाया करत आहे आणि आता एकदाच काय तो सोक्षमोक्ष लागला गेलाच पाहिजे. पाक ने ही वेळ स्वतःहून ओढवून घेतली आहे आणि पाकला 'विनाशकाले विपरित बुद्धी' सुचली असेच दिसते. दहशतवादा विरुद्धचा लढा भारताच्या पुढाकाराने लढला जात आहे आणि तो आता निर्णायक विजय मिळवूनच संपणार आहे.

**– अनंत बोरसे –**
**शहापूर जिल्हा ठाणे**
**मो.९१५८४९५०३७**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# 'खो-खो' त महाराष्ट्राची सलग सातव्यांदा सुवर्ण भरारी

## पदकाचा डबल धमाका; मुलांना सुवर्ण, मुलींना रौप्य





**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०९, गया (बिहार) :** महाराष्ट्राने आपली हुकूमत गाजवित ७ व्या खेलो इंडिया युवा स्पर्धेतदोन्ही गटातसलग सातव्यांदा पदकाला गवसणी घातली. मुलांनी सुवर्ण, तर मुलींच्या संघाने रूपेरी यश संपादन केले. जलतरणात पदकाचा धडका कायम ठेवत रिलेमध्ये महाराष्ट्राने सुवर्णासह १ रौप्य व १ कांस्य पदकाची कमाई केली. बिपार्ड मैदानावर संपलेल्या खो खो स्पर्धेत महाराष्ट्राचा जयजयकार दुमदुमला. मुलांच्या गटात महाराष्ट्राने ओरीसावर ३४-२५ गुणांनी मात करून सलग सातव्यांदा सुवर्ण पदक जिंकण्याचा पराक्रम केला. मुलींच्या गटात ओरीसाकडून महाराष्ट्र ३१-३४ गुणांनी पराभूत झाला. केवळ ३ गुणांनी महाराष्ट्राचे सुवर्णपदक हुकले.

या संघातील विश्वविजेत्या अश्विनी शिंदे हीने सलग चौथ्यांदा पदक जिंकण्याचा विक्रम ही नोंदविला. मुलांच्या गटात सुरूवातीपासून ओरीसा विरूध्द महाराष्ट्राने आक्रमक खेळ केला. अचूक गडी टिपून संरक्षणात ही महाराष्ट्र आघाडीवर राहिला. जितेंद्र वासवे याने तब्बल २ मिनिटाची ड्रीम रन करीत ओरीसाला झुंजवलेपूर्वार्धात १६-१० गुणांनी आघाडी घेतल्यानंतर आशिष गौतम, राज जाधव व शरद घाडगे यांनी अष्टपैलू खेळ करीत पहिल्याच फेरीपासून विजयी वाटचाल सुरू केली होती. ९ गुणांनी विजय संपादून महाराष्ट्राने खेलो इंडियातील आपली सुवर्ण परंपरा कायम राखली. पदकवितरण समारंभानंतर गणपती बाप्पा मोरया, जय भवानी-जय शिवाजी जयघोष करण्यात आला.

मुलींच्या गटात महाराष्ट्राची आक्रमणात पिछेहाट झाल्याने ओरिसाने बाजी मारली.अटीतटीच्या लढतीत पहिल्या मिनिटापासून महाराष्ट्राने चपळ दर्शवली. अमृता पाटील, सुहानी धोत्रे व प्रतिक्षा बिराजदार यांचा अष्ट्रपैलू खेळ सामना जिंकण्यासाठी अपुरा ठरला. गडी बाद करण्यात अपयश आल्याने ओरीसाने ३ गुणांनी विजेतेपद पटकावले. खेलो इंडिया स्पर्धेत महाराष्ट्राच्या मुलीचे हे सातवे पदक आहे. गत तामिळनाडू स्पर्धेत महाराष्ट्र चॅम्पीयन ठरला होता.बिपार्ड जलतरण तलावावर सुरू असलेल्या जलतरणात मुलींच्या ४ बाय १०० मीटर रिलेमध्ये महाराष्ट्राने सुवर्णपदकाचा सूर मारला. निशी रुहील, समाईरा मल्होत्रा, आदिती हेगडे, अल्फेया धनसुरा या संघाने ४ मिनिटे ३१.०९ सेकंद वेळ नोंदवत सुवर्ण कामगिरी केली. कर्नाटकला रौप्य तर तमिळनाडूला कांस्यपदकावर समाधान मानावे लागले.

आदिती हेगडेने स्पर्धेत पदक जिंकण्याचा षटकार झळकविला आहे. ४ सुवर्ण २ रौप्य पदकाची सर्वाधिक पदकाची करिश्मा घडविला आहे.१८ वर्षांखालील मुलींच्या २०० मीटर मिडले प्रकारात निशी रुहील (२:२९.६२ सेकंद) हिला रौप्य पदकावर समाधान मानावे लागले. कर्नाटकच्या मानवी वर्माने (२:२८.०३ सेकंद) सुवर्णपदक पटकावले. मुलांच्या ८०० मीटर फ्रीस्टाईल प्रकारात महाराष्ट्राच्या अथर्वराज पाटील (८.४२.१५ सेकंद) याला कांस्यपदाकवर समाधान मानावे लागले. निशी व अथर्वराजचे हे स्पर्धेतील दुसरे पदक आहे.आपल्या पाल्याचे यश पहाण्यासाठी अनेक खेळाडूंचे आई-वडिल स्टेडियममध्ये हजर होती. महाराष्ट्रातील खेळाडूंचे पोस्टर प्रर्दशित करीत त्यांच्या पालकांनी त्यांनी प्रोत्साहित केले.

# दोघे तोतया आरटीओ अधिकारी बीड पोलिसांच्या ताब्यात

## तोतया आरटीओसह वाहन चालकाविरुद्ध पाथर्डी पोलिस ठाण्यात तक्रार

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०९, पाथर्डी (अहिल्यानगर) :** आरटीओ कार्यालयाचा लोगो लावलेल्या स्कॉर्पिओ गाडीत खाकी गणवेश घालून वाहन चालकांकडून पैसे उकळण्याचा प्रयत्न करणार्या दोन तोतया आरटीओ अधिकार्यांच्या विरोधात पाथर्डी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मोटार वाहन निरीक्षक सुनिल पाटील यांनी फिर्याद दिली असून या घटनेतील दोघाही तोतया अधिकार्यांना बीड जिल्ह्यातील एलसीबीच्या पथकाने अटक केली. नगर येथील केवल जग्गी यांच्या मालकीचा ट्रक घेऊन चालक अशोक पांचाळ हा बीडकडे जात असताना पाथर्डी तालुक्यातील देवराई येथे आरटीओचा लोगो लावलेली स्कॉर्पिओ गाडी आली व त्यांनी ट्रक चालकाला गाडीचे फिटनेस प्रमाणपत्र संपले असून यामुळे ६४ हजार दंड भरावा, असे सांगत २५ हजारांची तडजोड केली. दरम्यान या प्रकाराचा जग्गी



यांना संशय आला व त्यांनी मोटार मालक कल्याणकारी संघटनेचे अध्यक्ष बाबा सानप यांच्याशी संपर्क केला. सानप त्यांनी संबंधित तोतयांशी चर्चा केल्यानंतर त्यातील एकाने मी वडाळा आरटीओ मधून सूर्यवंशी बोलतोय असे सांगितले. सानप यांना ही संशय आल्याने त्यांनी उपप्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद सगरे यांना या प्रकरणाची माहिती दिली. सगरे यांनी पाटील यांना चौकशी करण्यास सांगितले.

पाटील यांनी स्कॉर्पिओ गाडी कोणत्या ठिकाणची आहे, याची चौकशी केली असता, ती ठाणे आरटीओ कार्यालयाची असल्याचे समोर आले. मात्र त्यांची गाडी त्यांच्या कार्यालयात असल्याचीही माहिती मिळाली व तेथे सूर्यवंशी नावाचे कोणीही अधिकारी नाहीत असे समजले. त्या नंतर पाटील यांनी आरोपी विरोधात पाथर्डी पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल केला.

दरम्यान हे दोघेही तोतया अधिकारी बीड जिल्ह्यात गेले असल्याचे समजताच अहिल्यानगर आरटीओ कार्यालयाने बीड आरटीओ कार्यालयाशी संपर्क केला व बीड आरटीओ कार्यालयातील अधिकारी गणेश विघ्ने यांनी या दोघांना गाडीसह ताब्यात घेत बीड पोलिस स्टेशनला गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान,आरोपीची नावे अजय गाडगे व दिनेश धनवर असल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले.

# देशगौरवासाठी पक्ष, धर्म, भाषा, जात विसरून एकत्र येणे हेच भारतीयत्वाचे खरे दर्शन : आ.जोरगेवार

## भारतीय सैन्य दलाच्या अतुलनीय शौर्याला सलाम करण्यासाठी सर्वपक्षीय, सर्वधर्मीय कार्यक्रमाचे आयोजन

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०९, चंद्रपूर :** भारतीय सैन्य हे केवळ रणांगणावर लढणारे शूर योद्धे नाहीत, तर प्रत्येक भारतीयांसाठी प्रेरणेचा स्रोत आहेत. त्यांचे शौर्य, त्यांची निःस्वार्थ सेवा आणि मातृभूमिबद्दलची निष्ठा हीच खरी देशभक्ती आहे. १४० कोटी भारतीयांचा पाठिंबा सैन्याचा आत्मविश्वास वाढवतो. आज आपण पक्ष, धर्म, भाषा, जात विसरून एकत्र आलो आहोत, हेच भारतीयत्वाचे खरे दर्शन असल्याचे प्रतिपादन आमदार किशोर जोरगेवार यांनी केले.

भारतीय सैन्य दलाच्या अतुलनीय शौर्याला सलाम करण्यासाठी आ.किशोर जोरगेवार यांच्या वतीने गांधी चौकातील महानगरपालिकेच्या पटांगणावर वंदन भारतीय सैन्याच्या शौर्याला या राष्ट्रप्रेम जागवणाऱ्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमात सर्वपक्षीय आणि सर्वधर्मीय नागरिकांनी एकत्र येत भारतीय सैन्याला सामूहिक वंदन केले. यावेळी आ.जोरगेवार बोलत होते. कार्यक्रमास संत मनीषजी महाराज, पास्टर बिपीन, जामा मस्जिदचे मौलाना इमाम दिलशाद रजा, माजी सैनिक अश्विन दूर्गे, रोशन अलोणे, ओबीसी नेते डॉ. अशोक जीवतोडे, काँगेसचे माजी नगर सेवक नंदु नागरकर, शिवसेनेचे जिल्हा अध्यक्ष बंडू हजारे, जनविकास सेनेचे संस्थापक अध्यक्ष पप्पू देशमुख, दशरथसिंह ठाकूर, माजी महापौर अंजली घोटेकर, माजी उपमहापौर अनिल फुलझले, तुषार सोम, प्रकाश देवतळे, सुभाष कासनगोट्टूवार, राष्ट्रवादी पक्षाच्या नेत्या चारुशीला बारसागडे, भाजपचे माजी नगर सेवक राहुल घोटेकर, नामदेव डाहुले, बंटी घाटे, गुरुदेव सेवा मंडळाचे दादाजी नंदनवार मिलिंद गंपावार, भाजपचे माजी नगर सेवक राहुल घोटेकर, पंडित मथुराप्रसाद पांडे, नळे, माजी सैनिक राजेंद्र भोयर, माजी सैनिक गोविंदा डोमकावळे, माजी सैनिक धोंडुबा सपाट, माजी सैनिक मदन देशकर, माजी सैनिक अरुण मालेकर, डॉ. अशोक वासलवार, अजय जैस्वाल, मधुसूदन रुंगठा, संजय बुरघाटे, वाणी राव, अनिल समर्थ आदींची मंचावर उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना आ. जोरगेवार म्हणाले, आज आपण केवळ एक भावना, एक श्रद्धा आणि एक अभिमानाने भारतीय सैन्याच्या अतुलनीय शौर्याला सलाम करण्यासाठी एकत्र आलो आहोत.




आपल्या देशाच्या सीमांचे रक्षण करणारे, कठीण हवामानातही ताठ मानेने उभे असलेले, प्रत्येक संकटात देशवासियांचा जीव मोलाचा मानणारे भारतीय जवान आपल्या देशाचे खरे हिरो आहेत. भारतीय सेना ही केवळ एक लष्करी शक्ती नाही, ती आपली अस्मिता आहे, आपली सुरक्षा आहे आणि आपले अभिमानाचे प्रतिक आहे.

आजच्या कार्यक्रमात सर्व धर्मीय आणि सर्वपक्षीय लोक एकत्र आले आहेत. हाच खरा भारत आहे. विविधतेत एकता आणि राष्ट्रप्रेम हाच आपल्या संस्कृतीचा पाया असून, हाच देशाचा गौरव आहे.

देशासाठी लढणारा जवान जात, धर्म, पक्ष, प्रांत याच्या पलीकडे जातो. त्याला फक्त भारत माता दिसते. भारतीय सैन्याच्या पराक्रमामुळेच आपण शहरात आणि गावात सुरक्षित आहोत. त्यांच्या बलिदानाची परतफेड कधीच शक्य नाही, पण त्यांच्या कार्याला अभिवादन करणे हे आपले कर्तव्य आहे, सैन्याने केवळ सीमारेषा सुरक्षित ठेवल्या नाहीत, तर आपल्याला स्वाभिमानाने जगण्याचा अधिकार दिला आहे. त्यांच्या योगदानाची आठवण फक्त १५ ऑगस्ट आणि २६ जानेवारीला झाली तर ती पुरेशी नाही. ही कृतज्ञता आपल्याला दररोज जगायला हवी. असेही ते म्हणाले.

या कार्यक्रमात माजी सैनिकांचा सत्कार करण्यात आला. यावेळी विविध धर्मीय आणि सर्वापक्षीय नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. अमजद खान यांनी आभार प्रदर्शन केले तर प्रज्ञा जीवनकर यांनी सूत्र संचालन केले.

# थोडक्यात

## खडकवाडी येथील पाझर तलाव मधील गाळ काढणे कामांचा शुभारंभ

**अक्षराज : वसंत रांधवण**



**दि.०९, पारनेर (अहिल्यानगर) :** महाराष्ट्र शासनाच्या गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार योजनेंतर्गत खडकवाडी गावातील पाझर तलावातील गाळ काढणे आणि खोलीकरणाच्या कामांचा शुक्रवार, दि.०९ मे २०२५ रोजी आमदार काशिनाथ दाते यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. यावेळी विकास रोकडे, अरुण गागरे, संजय कर्नावट, कोंडीभाऊ गागरे, संजय शिंगोटे, यशवंत हुलावळे, शिवाजी रोकडे, ज्ञानदेव गागरे, दिनकर ढोकळे, अनिल गागरे, दगडू केदार, संजय खणकर, बबन गागरे, प्रदीप ढोकळे, सखाराम नवले, बाबासाहेब गागरे, नवनाथ गागरे, नवनाथ खणकर, रामदास नवले, आंबादास नवले, शिवाजी गागरे, दादाभाऊ हुलावळे, बी डी ढोकळे, अमोल रोकडे, धनंजय ढोकळे, संतोष रोकडे, प्रसाद कर्णावट, दिनकर ढोकळे, विठ्ठल शिंदे आदी उपस्थित होते. गेल्या अनेक दिवसांपासून स्थानिक शेतकऱ्यांची तलावातील गाळ काढण्याची मागणी होती. आमदार दाते यांनी शेतकऱ्यांच्या या समस्येकडे लक्ष देऊन गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार योजनेच्या माध्यमातून हा प्रश्न मार्गी लावला. या प्रकल्पामुळे तलावातील गाळ काढल्यानंतर पाणी साठवण क्षमता वाढणार असून, परिसरातील शेतकऱ्यांना याचा मोठा फायदा होणार आहे. शेतकऱ्यांनी आमदार दाते यांचे आभार मानले असून, या योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी सर्वोतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले आहे.

## धाराशिव येथील बाह्यवळण रस्त्यालगतचा सर्व्हिस रोड व नालीचे काम निकृष्ट

### कामाची गुणवत्ता तपासून दर्जेदार काम करा अन्यथा आंदोलन करू - शिवसेनेचा इशारा

**अक्षराज : संगीता वनकळस**




**दि. ०९ , धाराशिव :** धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गालगत सर्व्हिस रस्त्याचे व नालीचे काम करण्यात येत आहे. रस्ता व नालीचे काम करताना त्याची गुणवत्ता राखण्यात आली नसल्याचे दिसत आहे. त्यामुळे या कामाची पाहणी करून दर्जेदार काम करण्याचे आदेश संबंधित कंत्राटदाराला देण्यात यावे असे निवेदन शिवसेनेच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले. शिवसेना शहरप्रमुख सोमनाथ गुरव यांच्या नेतृत्वाखालील शिष्ट मंडळाच्या वतीने मागणीचे निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, या सर्व्हिस रस्त्याच्या दोन्ही बाजुंनी केलेल्या नालीवरील स्लॅब काही दिवसांतच कोसळले आहेत. अनेक ठिकाणी नालीवर मोठे भगदाड पडल्याने त्यापासून वाहनधारक, नागरिकांना धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. नालीवर स्लॅब टाकल्यानंतर त्यावर पुरेसे पाणी मारण्यात आले नाही. परिमाणी काही दिवसांतच स्लॅब कोसळण्याचे प्रकार सुरू आहेत. त्यामुळे हे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाल्याचे स्पष्ट होत आहे. या सर्व्हिस रस्त्याच्या दोन्ही बाजुंनी नागरी वसाहती आहेत. या वसाहतीमध्ये जाण्यासाठी असलेल्या रस्त्यावर नालीचे बांधकाम करताना काही ठिकाणी डांबरी रस्त्यापासून नालीची उंची अधिक झाली आहे. त्यामुळे दुचाकी, चारचाकी वाहने घेऊन जाण्यासाठीही नागरिकांना कसरत करावी लागत आहे. शिवाय सर्व्हिस रस्त्यालगत विजेचे खांब उभारण्यात आले आहेत. हे खांबही सरळ रेषेत नाहीत. सर्व्हिस रस्ता एकसमान नाही. काही ठिकाणी त्याची रुंदी कमी केलेली आहे. हा रस्ता सर्वच ठिकाणी ६ मीटर रुंदीचाच करावा. एकंदरित सर्व्हिस रस्ता, त्यालगतच्या नालीचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे करण्यात आले असून, या सर्व्हिस रस्त्याची देखभाल करणाऱ्या संबंधित सक्षम अधिकाऱ्याला सोबत घेऊन आपण या कामाची स्वतः पाहणी करावी, उर्वरित काम थांबवावे व हे काम दर्जेदार करण्याबाबत संबंधित अधिकारी व कंत्राटदाराला आदेशित करावे. तसेच सदरील कामाची गुणवत्ता गुणनियंत्रकाकडून (क्वॉलिटी कंट्रोल) तपासावी. या सर्व्हिस रस्त्याचे व त्यालगतच्या नालीचे काम दर्जेदार नाही झाल्यास तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे.

निवेदनावर शिवसेना शहरप्रमुख सोमनाथ गुरव, रवि वाघमारे, युवराज देशमुख,प्रदीप साळुंके, युवराज मसे,महेश शेरकर, सुहास शेरकर, बाळासाहेब जेवे, शिवाजी इंगळे, नागेश जगदाळे, बालाजी शेरकर,सागर शेरकर, बंडू पाटील, अमित शेरकर, नवनाथ शेरकर, ऋषिकेश शेरकर, अभिषेक शेरकर, अभिजीत शेरकर, सुरज शेरकर, कैलास शेरकर, हरिश्चंद्र शेरकर, सुरेश शेरकर, संपत शेरकर, सुरज शेरकर, श्रीनिवास शेरकर, ओंकार शेरकर, प्रथमेश शेरकर, अंगद शेरकर, धोंडीबा शेरकर, निजाम शेख, इब्राहिम शेख, रमेश ढवळे, राज निकम, प्रसाद तेरकर, किरण शेरकर, अनिल शेरकर, सुमित बागल आदींची स्वाक्षरी आहे.

## साश्रुनयनांनी शहीद सचिन वनंजे यांच्या पार्थिवावर लष्करी इतमामात अंत्यसंस्कार

**अक्षराज : वृत्तसंकलन**



**दि.०९, नांदेड :** भारतीय सैन्य दलात कार्यरत असलेले जवान सचिन यादवराव वनंजे यांचा देशसेवेच्या कर्तव्यावर असताना श्रीनगरच्या परिसरात दिनांक ०६ मे २०२५ रोजी अपघाती मृत्यू झाला होता. शुक्रवार, दिनांक ०९ मे २०२५ रोजी देगलूर येथे अत्यंत शोकाकूल वातावरणात साश्रुनयनांनी त्यांच्या पार्थिवावर लष्करी इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी लोकप्रतिनिधी, अधिकारी व मोठ्या नागरिक उपस्थित होते. सचिन यांच्या निधनाची माहिती भारतीय सैन्यदलामार्फत त्यांच्या कुटुंबियांना मिळताच तालुक्यातील तमलूरसह देगलूरवर शोककळा पसरली. शहीद सचिन यांचे पार्थिव आज देगलूर येथील त्यांच्या राहत्या घरी पहाटे ४ वाजता दाखल होताच परिवारातील सदस्यांसह उपस्थितांच्या डोळ्यातून अश्रुधारा वाहू लागल्या. सकाळी ठिक ८.३० वाजता फुलांनी सजवलेल्या लष्कराच्या वाहनातून शहिद सचिन वनंजेच्या घरापासून अंत्ययात्रेला प्रारंभ झाला. शहरातील मुख्य मार्गाने नगरपालिका शेजारी असलेल्या मैदानात अंत्यविधीसाठी त्यांचे पार्थिव आणण्यात आले. यावेळी शहिद सचिन वनंजे, अमर रहे...अमर रहे च्या घोषणांनी परिसर दणाणून गेला.